विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२५
**शशीकला वि. सुरेखा**
**नि.क्र. २५ पुढे**

**नि. क्र. ६५ वरील आदेशान्वये वादीचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. विकास एस. भोयर यांचेमार्फत शपथेवर सुरू**

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे आईचे नाव शोभा होते व त्या मरण पावल्या. हे म्हणणे खरे नाही की, शोभा हया विठ्ठल निगोट यांच्या पत्नी होत्या ही बाब मला पुर्वीपासुन माहित होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे शोभा व विठ्ठल निगोट यांच्या संबंधातुन जन्माला आले ही बाब मला पुर्वीपासुन माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगते की, मी विठ्ठल निगोट यांची दुसरी पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८७ साली विठ्ठल निगोट यांची पत्नी शोभा ही आंधळी होती व तीची दृष्टी हळुहळु कमी होत गेली. हे म्हणणे खरे नाही की, शोभा यांना दिसत नसल्याने मला प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची देखभाल करण्याकरिता व घरकाम करण्याकरिता विठ्ठल निगोट यांनी ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे कथीत लग्नाआधी मी विठ्ठल व शोभा यांच्या कोणत्याही नात्यातली नव्हती. सदर नात्याबाबत मी दाव्यात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी मोठे झाल्यानंतर मला कामावरून काढुन टाकण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी विठ्ठल निगोट यांच्याशी वादविवाद करून मी त्यांची पत्नी असल्याबाबत खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी विठ्ठल निगोट याचेसोबत कधीही राहीले नाही व त्यांनी मला पत्नीचा दर्जा कधीही दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व विठ्ठलचे संबंधातुन वादी क्र. २ व ३ जन्माला आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. २ व ३ विठ्ठलसोबत कधीही राहीले नाही. मी माझया दाव्यात मी तसेच माझे मुले विठ्ठल सोबत कुठे राहीले ही बाब नमुद केली नाही. हे खरे आहे की, मी विठ्ठलविरूध्द नागपूर येथील न्यायालयात पोटगीचे प्रकरण दाखल केले होते.

हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण गुणवत्तेवर न्यायालयाने खारीज केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरण खारीज झाल्यानंतर मी सदर न्यायनिवाडयाविरूध्द अपील दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणात मी विठ्ठल निगोट यांची पत्नी आहे हे सिध्द करू शकली नाही त्यामुळे ते प्रकरण खारीज झाले. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीची किंमत दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे मी प्रतिवादीविरूध्द खोटा दावा आणला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना ही बाब माहित नाही की, वादी क्र. २ व ३ माझे मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शोभा ही विठ्ठल यांची फक्त एकमेव पत्नी होती. हे म्हणणे खरे नाही की, मी नि. क्र. २९ वरील खोटे प्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८८ साली मौदा येथे दुययम निबंधक कार्यालय अस्तीत्वात नव्हते. विठ्ठलसोबत माझे लग्न कोणत्या इसमाने लावले हे मला सांगता येणार नाही.

**<u>मध्यान्नामुळे उलटतपास तहकुब.</u>**

माझे समक्ष,

( एम.झेड.ए.ए.क्यु.कुरैशी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर.,
काटोल

दिनांकः२०.०१.२०२६

**मध्यांन्नानंतर उलटतपास शपथेवर पुढे सुरू**

४. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठलसोबत माझे लग्न झाले नाही त्यामुळे प्रमाणपत्र नि. २९ वर साक्षीदारांचे नाव व सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मौदा येथे कोणतेही राम मंदीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कुटुंब नियोजन कार्ड आर्टीकल ए खोटे बनविले. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल निगोट यांचा मुळ गाव राहुळगाव ता. काटोल हे आहे व ते तेथील रहिवासी होते. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल हे मौदयाचे रहिवासी नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, त्यांची नोकरी मौदा येथे होती व सध्या त्यांचे घर देखील तेथे आहे. मी प्रकरणात विठ्ठल निगोट

मोदा येथे नोकरी करत होते तसेच त्यांचे घर देखील तेथे आहे हे दाखविण्याकरिता लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आर्टीकल बी,सी. व डी. खोटे दाखल केले व असे कोणतेही लग्नाचे पत्रीका मला आले नाही. येथे वादीचे विधीज्ञ यांनी हरकत घेतली की, सदर लग्न पत्रीका साक्षीदाराला उलटतपासात दाखविण्यात आले आहे त्यामुळे त्यास निशाणी दयावे. यावर प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी सांगितले की, सदर दस्तऐवज खोटे आहे. त्यामुळे त्यांना निशाणी देता येणार नाही. सदर लग्नपत्रीकातील मजकुर किंवा सहया साक्षीदारांना दर्शविण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज उलटतपासात दाखविले (रेफर केले) त्यामुळे सदर दस्तऐवजांना निशाणी देता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगते की, शोभा हिने माझे विठ्ठलसोबत लग्नास सहमती दर्शविली होती. हे म्हणणे खरे आहे की, शोभा निगोट विठ्ठल निगोटची पहिली पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठल यांनी वादी क्र. २ व ३ यांना त्यांचे मुले असल्याबाबत दर्जा कधीही दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकत वडिलोपार्जीत मिळकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल निगोट हे प्रतिवादीकडे राहत असतांना मरण पावले. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठल यांची अत्यंविधी तसेच पुर्ण इतर खर्च दिपक निगोट यांनी केला. हे म्हणणे खरे नाही की, मी तसेच वादी क्र. २ व ३ विठ्ठल निगोट यांच्या अत्यंविधीला गेले नव्हते व त्यामुळे त्याबाबतचा मजकुर आम्ही दाव्यात नमुद केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठल निगोट यांनी दिनांक ०५.०३.२०१० रोजी रजिस्टर्ड खरेदीखताअन्वये दिपक निगोट यांना विकली. हे म्हणणे खरे नाही की, दिपक निगोट यांनी स्वकष्टाचे त्याच्याजवळ असलेले पैसे खरेदीखतावेळेस विठ्ठल निगोट यांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखताला आव्हान देण्याचा हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताच्या वेळेस दिपक यांनी विठ्ठल यांना वेळोवेळी ४,४०,०००/– रूपये नगदी स्वरूपात दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न विठ्ठल सोबत झाले नाही व त्यामुळे वारसाचा कायदा मला वादी क्र. २ व ३ यांना लागु होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात मागणीप्रमाणे

मी कोणतेही मालमत्तेस हक्कदार नाही.  हे म्हणणे खरे नाही की, फक्त प्रतिवादीला त्रास देण्यासाठी मी खोटा दावा आणला.

५.		वादमिळकतीवर दिपक यांचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकत कोरडवाहु जमीन आहे व तशी नोंद देखील सात बारा उता–यावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीत सात बारा उता–यात संत्रे, कापुस व सोयाबिन पिके व फळ घेण्याबाबत नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यास खोटे कारण दर्शवुन खोटा दावा आणला. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे मुलांचे खोटे दस्तऐवज दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे ओळखपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीत कसलाही माझा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

( एम.झेड.ए.ए.क्यु.कुरैशी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर.,
काटोल

दिनांकः२०.०१.२०२६